महापारेषण

# महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

**कार्यालयाचे नांव** – 400 के. व्ही. ग्रहण केंद्र गिरवली
**कार्यालयाचा पत्ता** – कार्यकारी अभियंता, 400 के. व्ही. ग्रहण केंद्र गिरवली,
ता.अंबाजोगाई जि.बीड. पीन को–431519
02446–259670(ऑफीस) 02446–259689(फॅक्स)
ई.मेल–**ee2210@mahatransco.in** **Website: - www.mahatransco.in**

जा.क्र.काअ/४००केव्ही/ग्र.के.(संवसु)/विभाग/गिरवली/ No 0504 दि. 31 MAY 2018

**ई–निविदा 2018-19/04**

**विषयः**– कंत्राट पध्दतीने विश्रामग्रह चालविण्यास देण्याबाबत ई–निविदा.

महोदय,

म.रा.वि.पारेषण कंपनीचे 400 के. व्ही ग्रहण केंद्र, गिरवली ता. अंबाजोगाई जि. बीड येथील विश्रामग्रह कंत्राटी पध्दतीने चालविण्यास देणे आहे. सदर विश्रामग्रहात एक अती महत्वाच्या व्यक्तीसाठीचे कक्ष एक प्रथम श्रेणी कक्ष शिवाय 7 ते 8 लोकांची राहण्याची सोय आहे. वरील विश्रामग्रह कंत्राटी पध्दतीने चालविण्यास कमीत कमी मागणी मागविण्यात येत आहे. तरी सदरच्या कंत्राटाची तुम्हाला अपेक्षित असलेली रक्कम परिशिष्ट अ व ब मध्ये भरुन दिनांक 08.06.2018, पर्यंत संध्याकाळी 5.00 वाजेपर्यंत वरील पत्यावर आपली निविदा भरून सादर करण्यात यावी.

**<u>सदर कंत्राटाच्या नियम व अटी खालील प्रमाणे</u>** :–

1. सदर निविदा संपुर्ण माहीतीसह भरुन कार्यकारी अभियंता 400 के.व्ही.ग्र.के. संवसु विभाग,गिरवली येथे बंद लिफाफयात दिलेल्या विहीत वेळेमध्ये सादर करण्यात यावी.

**विश्रामग्रहात खालील कामे करावी लागतील.**

2. विश्रामग्रह व त्यातील फर्निचर इत्यादीची सर्वसाधारण स्वच्छता व निगा राखणे विश्रामग्रहातील अतिथींना कंपनीने ठरवुन दिलेल्या दराने जेवण ,चहा, फराळ इत्यादी पुरविणे.
3. स्वयपांकासाठी लागणारे गॅस, स्टोव्हचे रॅकेल या करीताचा खर्च विश्रामगृह चालविणारानीच करावा लागेल.
4. अतिथी कडुन विश्रामग्रहात राहण्या बदलचा आकार वसुल करणे व त्यासंबंधी नोंदी ठेवणे व कार्यालयात वेळोवेळी रक्कम भरणे.
5. संबंधीत अधिका–यांना विचारुन त्याप्रमाणे अतिथीची राहण्याची सोय करणे.
6. विश्रामग्रहात 24 तास शाकाहारी ,मासांहारी चांगले जेवण तयार करणारा एक आचारी ठेवावा लागेल.
7. विश्रामगृह चालविण्या करीता मुंबई दुकाने व संस्था अधिनियम 1948 शॉप ॲक्ट 1961 संस्थेच्या नोदंणीचा दाखला आवश्यक आहे. जी.एस.टी. रजिस्ट्रेशन सर्टीफिकेट तसेच पॅन नंबर इनकम टॅक्स साठी आवश्यक आहे. सदरील दस्ताऐवज भरलेल्या निविदा सोबत सादर करण्यात यावे.
8. सर्व फर्निचर, भांडी, गॅस, फ्रिज, मिक्सर इत्यादी मंडळाकडुन पुरविण्यात येईल. व त्याची नुकसान झाल्यास कंत्राटदाराकडुन भरपाई घेण्यात येईल.
9. विश्रामग्रहाची साफसफाई सुद्धा कंत्राटात समाविष्ट आहे. साफसफाईचे लागणारे साहित्य कंपनी कडुन पुरविण्यात येईल.
10. जेवण, चहा, फराळ इत्यादीचा आकार म.रा.वि.पा.कं.म.लिं ने निर्देशीत केलेल्या प्रमाणेच ठेवावा लागेल. तथापी सदरची रक्कम पुर्णपणे कंत्राटदारास मिळेल.

11. व्यवसायीक पध्दतीने उपहारग्रह म्हणुन विश्रामग्रहाचा वापर करता येणार नाही.
12. पडदे, उशीचे कव्हर, बेडशीट वेळच्या वेळी स्वच्छ करावे लागतील.
13. एक अथवा सर्व कोटेशन रदद करणे अगर राखुन ठेवण्याचा अधिकार खालील स्वाक्षरीकाराने राखुन ठेवला आहे.
14. विश्रामग्रहाच्या तारेच्या आवारातील गवत कापुन आवार स्वच्छ व टापटीप ठेवणे हे कंत्राटदाराचे कर्तव्य आहे.
15. बागेतील विद्युत रोशनाईची यंत्रसामुग्री यांची निगा ठेवणे हे कंत्राटदाराचेच काम आहे.
16. महापारेषण कंपनीच्या कंत्राटाच्या सर्वसाधारण अटी लागु राहतील.
17. निविदा सादर करण्याची शेवटची तारीख 08.06.2018 संध्याकाळी 5.00 वाजेपर्यंत असेल.

आपला विश्वासु

कार्यकारी अभियंता
400के.व्ही ग्र.के. संवसु विभाग, गिरवली

प्रत सविनय सादरः–

1. अधिक्षक अभियंता अ.उ.दा. सवसु मंडल, परळी वै.

प्रत रवानाः–

1. उपव्यवस्थापक, वित्त व लेखा 400के.व्ही ग्र.के (संवसु) विभाग, गिरवली.

D:\Tech\Enquiry/Rest house/dt.31.05.2018.

महापारेषण

# महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

**कार्यालयाचे नांव** – 400 के. व्ही. ग्रहण केंद्र गिरवली
**कार्यालयाचा पत्ता** – कार्यकारी अभियंता, 400 के. व्ही. ग्रहण केंद्र गिरवली,
ता.अंबाजोगाई जि.बीड. पीन को–431519
02446–259670(ऑफीस) 02446–259689(फॅक्स)
**Website: - www.mahatransco.in** ई.मेल-**ee2210@mahatransco.in**

**परिषिष्ट 'अ'**

400के.व्ही ग्रहण केंद्र गिरवली येथील विश्रामगृह कंत्राट पध्दतीने चालविणे व देखभाल करणे , तपशिल खालीलप्रमाणे–

| तपशिल | दर प्रति महिना |
|---|---|
| अ. कामाचे स्वरूप – फरशा व पी.व्ही.सी.कार्पेट ओल्या कपडयाने पुसने,सुवासीक फिनेल वापरून ओल्या फडक्यांने भिंती पुसणे,संडास व बाथरूम फिनेल ॲसिड वापरून स्वच्छ करणे व त्यामध्ये डांबर गोळया , ओडोनिल वगैरे व जंतुनाशक व सुवासिक वस्तु जरूरी नुसार ठेवणे आरसे खिडक्याच्या काचा स्वच्छ ठेवणे, अतिथीगृहाच्या अतंर्गत भागा तील स्वच्छता, झाडलोट, फर्निचर साफसफाई इ. कामे करणे अतिथी गृहाच्या बाहेरील आवाराची साफसफाई करणे, पंलग ,फोन व इतर वस्तु साफ करणे व बेडशीट व खोळी इस्त्री करणे, त्याच प्रमाणे अतिथी गृहातील अतिथीना जेवण, चहा व फराळ पुरविणे व स्वयंपाक गृहातील इतर कामे उदा. भांडी घासणे,झाडु करणे, कोकरी व इतर सामान व्यवस्थीत ठेवणे व वरील सर्व कामासाठी योग्य तो कर्मचारी / कामगार ठेवणे, अतिथी गृहातील सामान व तसेच आवारातील झाडांचे ,बागेचे रक्षण करणे इत्यादी कामे. | |
| ब. अतिथी कडुन योग्य ती निवासी आकार वसुलकरणे व प्रत्येक महिण्याच्या 15 तारखेस त्याचा कार्यालयात भरणे करणे, नियंत्रण अधिका–याच्या सुचने नुसार अतिथी गृहाचे इतर सर्व योग्य ती देखभाल स्वरूपाची कामे करणे. | |

<u>परिषिष्ट 'ब'</u>

| अनु. क | विवरण | दर रुपये |
|---|---|---|
| 1 | जेवण मर्यादित, भात, वरण,,पाले भाजी, भाजी, दही, लोणचे / चटणी 05 चपात्या, पापड, जादा चपाती | |
| 2 | जेवण मर्यादित भात, वरण, पाले भाजी, भाजीए दही,लोणचे / चटणी 05 चपात्या,पापड, गुलाबजामुन, अथवा श्रीखंड गोड पदार्थ | |
| 3 | जादा चपाती | |
| 4 | पोहे | |
| 5 | उपमा | |
| 6 | एक भाजी पाच चपात्या | |
| 7 | चहा | |
| 8 | कॉफी | |
| 9 | आम्लेट 2 अंडी ब्रेड बटर 2 ब्रेड स्लाईड | |
| 10 | अंडाकरी डबल | |
| 11 | मटन थाळी ऑर्डर प्रमाणे मर्यादित | |
| 12 | चिकण थाळी ऑर्डर प्रमाणे मर्यादित | |
| 13 | अंडाबुरजी डबल | |

एकुण मर्यादीत रक्कम <u>परिषिष्ट 'अ'</u> व <u>परिषिष्ट 'ब'</u> नुसार रु. 2 लाख (करासहित)

कार्यकारी अभियंता
400के.व्ही ग्र.के. (संवसु) विभाग गिरवली

**नाव, सही, व संस्थेचा पत्ता**

**पत्ता :** ______________________

______________________

______________________

**भ्रमण ध्वनी :** ______________________

**सही**
**सोबत रबरी षिक्का**

कार्यकारी अभियंता
**400के.व्ही ग्र.के. संवसु विभाग गिरवली.**

D:\Tech\Enquiry/Rest house/dt.31.05.2018.